Beed | DAILY | MARATHI | Year-03 | Issue -309 | SATURDAY DT.10 FEBRUARY 2024 | RNI-MAHMAR/2021/80074 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

बीड | दैनिक | मराठी | वर्ष -०३ | अंक -३०९ | शनिवार,दि.१० फेब्रुवारी २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२१/८००७४ | । किंमत ३ रु | । पाने ४




दैनिक • महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955

# ‘ज्ञानराधा’’चे चेअरमन कुटेंच्या विरोधात गुन्हा दाखल करावा

## गेवराई न्यायालयाकडून आदेश, कुटेंच्या अडचणीत वाढ

प्रतिनिधी । बीड

**ज्ञानराधामल्टिस्टेट पतसंस्थेचे चेअरमनतथा कुटे उद्योग समूहाचेमालक सुरेश कुटेयांच्याविरोधातफसवणूक व ठेवीदारहित संरक्षणकायद्यानुसार गुन्हानोंदवण्याचे आदेशगेवराई प्रथमवर्गन्यायदंडाधिकाऱ्यांनी दिले. यामुळे कुटेयांच्या अडचणीत वाढ झाली आहे.**

**बीड येथील कुटे उद्योग समूहाचे मालकआणि ज्ञानराधा मल्टिस्टेट पतसंस्थेचेचेअरमन सुरेश कुटे यांच्या उद्योग समूहावरकाही महिन्यांपूर्वी प्राप्तिकर विभागानेछापेमारी केली होती. यानंतर ज्ञानराधापतसंस्थेतून ठेवी काढण्यासाठी ठेवीदारांचीझुंबड उडाली होती. यामुळे ५२ शाखाअसलेली ज्ञानराधा पतसंस्था आर्थिकअडचणीत आली. ठेवीदारांचे पैसे देण्यास पतसंस्थेकडून वेळलागत आहे. वारंवार नव्या तारखा कुटेठेवीदारांना देत आहेत.**



दरम्यान, गेवराई शाळेचे ठेवीदार योगेशमुंदडा यांची १६ लाख ५० हजार रुपयांचीमुदत ठेव होती. ही मुदत ठेव मिळावीयासाठी त्यांनी वारंवार कुटे यांना संपर्कसाधला. मात्र त्यांनी चालढकल केली.त्यामुळे मुंदडा यांनी गेवराई पोलिस ठाणे,आर्थिक गुन्हे शाखा, पोलिस अधीक्षकयांच्याकडे तक्रार केली. मात्र पोलिसांनीहीगुन्हा नोंद केला नाही.

यामुळे मुंदडा यांनी गेवराई येथील प्रथम वर्गन्यायदंडाधिकाऱ्यांच् या न्यायालयात अर्जकेला होता. यावर न्यायालयाने सुरेश कुटेयांच्यावर गुन्हा नोंद करण्याचे व तपासकरून दोषारोपपत्र न्यायालयात दाखलकरण्याचे आदेश दिले आहेत. तशा प्रकारचेपत्र गेवराई पोलिसांना दिले गेले आहे.





# मनोज जरांगेंचे पुन्हा उपोषण

प्रतिनिधी । बीड

**मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आजपासून (१० फेब्रुवारी) जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषणाला बसणार आहे. राज्य सरकारने सगेसोयरे अध्यादेशाची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी जरांगे यांनी केली होती. यासाठी त्यांनी सरकारला ९ फेब्रुवारीपर्यंतची डेडलाईन दिली होती.**

मात्र, सरकारकडून अध्यादेशाची अंमलबजावणी झाली नसल्याने मनोज जरांगे यांनी आजपासून पुन्हा उपोषणाचं हत्यार उपसलं आहे. मुंबईत मराठा आंदोलक धडकण्याआधीच राज्य सरकारने तातडीने अध्यादेश काढून मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याचे जाहीर केले होते.

सगेसोयऱ्यांचा अध्यादेश निघाल्यानंतर जरांगे यांनी आपले आंदोलन मागे घेतले होते. मात्र, सरकारने जरांगे यांच्यासह मराठा समाजाची फसवणूक केल्याची टीका सोशल मीडियामधून होत आहे. या टीकेवरही जरांगे यांनी संताप व्यक्त केला असून टीकाकारांना थेट इशाराच दिला आहे.

माझ्याविरोधात काहींनी सुपारी घेतलीय, यापुढे ते शांत न बसल्यास त्यांच्या पक्षासह त्यांच्या नेत्यांची नावं उघड करणार असल्याचा थेट इशारा जरांगेंनी दिला आहे.

**राज्य सरकारचं टेन्शन वाढणार, नेमकी मागणी काय?**

यासोबतच १० फेब्रुवारीपासून आपण कठोर आमरण उपोषण करणार, असंही जरांगे यांनी माध्यमांसमोर सांगितलं आहे.

दरम्यान, मराठा बांधवांनी देखील या आंदोलनाला पाठींबा देऊन आपापल्या आमदारांना तातडीने फोन करावे, असं आवाहनही जरांगे यांनी केलं आहे. मी देखील सर्व आमदारांना विनंती करतो, की मराठ्यांच्या मुलाबाळांसाठी आपण कायद्याच्या बाजूने उभा रहावं, असं देखील जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

# शेतकरी आत्महत्यांचे सत्र थांबता थांबेना!

## महिनाभरात ८२ जणांनी संपवले जीवन

प्रतिनिधी । छत्रपती संभाजीनगर

मराठवाड्यात शेतकरी आत्महत्यांचे सत्र थांबता थांबेना, अशी स्थिती आहे. गत महिनाभरात तब्बल ८२ शेतकऱ्यांनी विविध कारणांनी जीवनयात्रा संपवली. यात सर्वाधिक जालना जिल्ह्यात १९ तर हिंगोली जिल्ह्यात दोन घटनांचा समावेश आहे. दरम्यान, खुल्या प्रवर्गातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची वर्गवारी गोळा करूनही मराठा समाजाचे मागासलेपण तपासले जात असल्याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने राज्य मागासवर्गीय आयोगाने माहिती मागविल्याचे सूत्रांकडून सांगण्यात येते.


कधी अतिवृष्टी तर कधी दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आत्महत्यांत वाढ होऊ लागली आहे. दुष्काळ, नापिकी, अतिवृष्टी, शेतमालाला कमी भाव, कर्जबाजारीपणा अशा एक ना अनेक कारणांमुळे शेतकरी टोकाचे पाऊल उचलत आहेत. या आत्महत्या रोखण्याच्या दृष्टीने शासन पातळीवर विविध प्रयत्न होत आहेत. मात्र, हे प्रयत्न कमी पडत असल्याचे स्पष्ट होत आहे. गतवर्षी दुष्काळ, अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते.

जानेवारी ते मे या काळातही अवकाळी पावसामुळे शिल्लक राहिलेल्या पिकांचेही नुकसान झाले. शासनाने मदतीची घोषणा केली, परंतु ऑनलाईनच्या घोळात अद्याप शेतकऱ्यांपर्यंत मदत पोचली नाही. त्यातच यंदा कमी पाऊस झाल्याने उत्पादनात प्रचंड घट झाली आहे. मराठवाड्याची पैसेवारी ५० टक्क्यांपेपेक्षा कमी आहे. नोव्हेंबरमध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळेही शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. या स्थितीचा सामना शेतकऱ्यांना करावा लागत आहे.

मागील महिन्यात म्हणजेच १ जानेवारी ते ३१ जानेवारीपर्यंत ८२ शेतकऱ्यांनी विविध कारणांनी जीवन संपवले आहे. दररोज सरासरी दोन ते तीन शेतकरी जीवन संपवत आहेत.

अशी आहे परिस्थिती

२०२० या काळात मराठवाड्यातील ७७३



शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. २०२१ मध्ये ८८७, २०२२ मध्ये १०२२, २०२३ मध्ये ८७७ शेतकऱ्यांनी विविध कारणांनी आत्महत्या केल्या आहेत. तीन वर्षांत ३५५९ शेतकऱ्यांनी टोकाचे पाऊल उचलले.

# निखिल वागळेंच्या कारवर हल्ला करणं भोवलं

## भाजपच्या १० पदाधिकाऱ्यांवर पुणे पोलिसांत गुन्हा

प्रतिनिधी । मुंबई


ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे यांच्या कारची तोडफोड केल्याप्रकरणी पोलिसांनी भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे यांच्यासह १० पदाधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल केलाय. पुण्यातील पर्वती पोलीस ठाण्यात हा गुन्हा दाखल करण्यात आलाय. याप्रकरणाची सखल चौकशी केली जाईल, असंही पोलिसांनी सांगितलं आहे.

# बेपत्ता विवाहितेचा मृतदेह विहिरीत आढळला

## पतीवर खुनाचा गुन्हा; चकलांबा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

प्रतिनिधी । बीड

बुधवारपासून बेपत्ता असलेल्या विवाहितेचा मृतदेह गुरुवारी विहिरीत आढळून आला. याप्रकरणी विवाहितेच्या माहेरच्या मंडळींनी घातपाताचा आरोप करत पोलिसांत तक्रार दिली. यावरून पती, सासू वसासरा यांच्याविरोधात चकलांबा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्वाती संतोष गाडे असे मृतविवाहितेचे नाव आहे.याप्रकरणी स्वाती यांचा भाऊ अरुणलक्ष्मण कोरडे (रा. बोरी पिंपळगाव, ता.गेवराई) यांनी तक्रार दिली. त्यांच्यातक्रारीनुसार, बहीण स्वाती हिचा गेवराईतालुक्यातील अर्धपिंपरी येथील संतोषसर्जेराव गाडे यांच्याशी १५ वर्षांपूर्वीविवाह झाला होता. त्यांना ७ वर्षांचीमुलगी व ५ वर्षांचा मुलगा आहे.सुरुवातीला काही दिवस स्वाती हिलाचांगले




नांदवल्यावर सासरच्यामंडळींकडून तिचा छळ केला जाऊलागला. ट्रॅक्टरसाठी माहेरहून ५ लाखघेऊन ये म्हणत हा छळ केला गेला.त्यामुळे वडिलांनी ५ लाख रुपये दिले.त्यानंतर ट्रॅक्टरच्या अवजारांसाठी छळहोत होता.सध्या संतोष व स्वाती हेगुळज येथे ऊसतोडणीचे काम करतहोते. दरम्यान,गुरुवारी तिचा मृतदेहजवळच विहिरीत आढळून आला.याप्रकरणी पती संतोष गाडे, सासरासर्जेराव गाडे व सासू पार्वती गाडेयांच्याविरोधात गुन्हा दाखल झाला.

# मुलीचा फोटो काढल्याने राडा

परळी१३ तासांपूर्वी

परळी शहरात मलीचे फोटो काढल्याने राडा झाला आहे. मुलगी रस पिण्यासाठी रसवंतीगृहात आली असता तिथे काम करणाऱ्या एका कामगाराने मुलीचा फोटो काढला. हे मुलीच्या लक्षात आल्यानंतर रसवंतीगृहात राडा सुरू झाला. ही बातमी पोलिसांना कळताच पोलिसही घटनास्थळी दाखल झाले. मात्र पोलिसांनी आरोपीला काहीही न करता उलट मुलीच्या



नातेवाईकांसोबत अरेरावीची भाषा केली. त्यामुळे तणाव आणखी वाढला.

परळी शहरातील बाळकृष्ण रोडे चौकात असलेल्या लोकमान्य रसवंती गृहातील कामगाराने रस पिण्यासाठी आलेल्या मुलीचे फोटो काढल्याचे कळताच नागरीकांनी रसवंतीमधील त्या कामगारास चोप देत रसवंतीमध्ये चांगलाच राडा केला.पोलिसांनी हस्तक्षेप करत जमाव पांगवला असुन याबाबत रात्रीपर्यंत संभाजीनगर पोलिस ठाण्यात नोंद झालेली नव्हती.

परळी शहरातील आर्य समाज परिसरातील बाळकृष्ण रोडे चौकात असलेल्या लोकमान्य रसवंती गृहात नेहमीच आक्षेपार्ह व्यक्ती असतात यातच शुक्रवार दि.९ फेब्रुवारी रोजी रात्री आठ सात वाजता दोन मुली रस पिण्यासाठी आल्यानंतर तेथील कामगार मोबाईलमध्ये फोटो काढत असल्याचे त्या मुलींच्या लक्षात येताच त्यांनी ही बाब काही तरुणांना सांगितली.

# ट्रॅक्टरखाली चिरडून मारून पुतण्या फरार

प्रतिनिधी । कळंब

शेतातल्या रस्त्याच्या वादातून चुलतीला ट्रॅक्टरखाली चिरडून मारून पुतण्या फरार झाल्याची काळीज धडधड उडवणारी घटना कळंब तालुक्यातील शिराढोण येथे घडली असून, पोलिसांनी पुतण्याला तातडीने अटक केली आहे.हा प्रकार गुरुवार (ता.८) सकाळी ११ वाजता घडला, शुक्रवार (ता.९) आरोपीला न्यायालयात हजर करण्यात आले, त्याला ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. तालुक्यातील शिराढोंन येथील दोन चुलत भावात गेल्या



महिन्यापूर्वी शेत रस्त्यावरून वाद सुरू होता.

या वादावरून गुरुवारी सकाळी शिलाबाई परमेश्वर यादव (वय - ४०) या महिलेस तिच्या पुतण्याने घराकडे जात असताना ट्रॅक्टर अंगावर घातले.यात जीव जाईना म्हणून त्याने चार पाच वेळेस या महिलेच्या अंगावरून ट्रॅक्टर घालून चिरडले.

काळीज पिळवून टाकणारी घटना सकाळी ११ च्या सुमारास येथील पेट्रोल पंपासमोरील पडीक असलेल्या शेतात घडली.परमेश्वर गोविंद यादव व बालाजी विठ्ठल यादव या दोन चुलत भावात शेतात जाण्याच्या रस्त्यावरून ब-याच दिवसांपासून वाद सुरू होता. या रस्त्याच्या वादात दोन कुटुंबांमध्ये कांही महिन्यांपूर्वी हाणामारी झाली होती. या हाणामारीत तीक्ष्ण हत्याराचा वापर झाला होता. त्यावेळी दोन्हींकडील काही लोक गंभीर जखमी झाले होते. त्याच घटनेचा राग मनात धरून गुरुवारी सकाळी ११ वाजता घराकडे जाताना शिलाबाई परमेश्वर यादव या महिलेस चुलत पुतण्या समाधान बाळासाहेब यादव याने ट्रॅक्टरखाली घेवून चिरडले. दोन ते तीन वेळा ट्रॅक्टरखाली घेतल्यामुळे ती गंभीर जखमी झाली.

# यंदा मराठवाड्यात लवकर पिकणार आंबा

## फेब्रुवारीतच मोहरल्या आमराया, ‘केशर’ कडून उत्पादकांच्या उंचावल्या अपेक्षा

प्रतिनिधी । छत्रपती संभाजीनगर

**दरवर्षी साधारणतः एप्रिलमध्ये मराठवाड्यातील केशर आंबा बाजारात येतो. त्याचवेळी गुजरातमधील केशर आंबा येतो. यामुळे आपल्याकडील केशरचे भाव कमी होतात. मात्र, यंदा केशर आंब्याला लवकर मोहर आल्याने केशर आंबा काढणीला आणि खवय्यांना नेहमीपेक्षा लवकर चाखायला मिळण्याची शक्यता वाढली आहे. यंदा लवकर मोहोर आल्याने मार्चच्या अखेरीलाच काही भागांत केशर आंबा काढण्यासाठी येणार आहे. त्यामुळे चांगला भाव मिळेल, याची अपेक्षा आंबा उत्पादकांनी व्यक्त केली.**

राज्यात कोकण वगळता केशर आंब्याची ५१ हजार हेक्टर क्षेत्रात लागवड असून, यापैकी १४



हजार हेक्टरमधील बागा फळधारणेच्या आहेत. राज्यात महाकेशर आंबा उत्पादक संघाच्या माध्यमातून अतिघन लागवडीला प्रोत्साहन दिले जात असून, सुमारे ९ ते १० हजार हेक्टर क्षेत्रात अतिघन लागवड पद्धतीने केशरच्या बागा करण्यात आल्या आहेत. डॉ. भगवानराव कापसे यांनी सांगितले, ‘‘दरवर्षी साधारणतः डिसेंबर-जानेवारीत मोहर येत असतो.

मेच्या मध्यापासून आंबे खायला मिळतात. त्याचवेळी गुजरातमधील केशरदेखील विक्रीसाठी आपल्याकडे येतो. त्यामुळे आपल्या इथे होलसेलचे भाव खाली येतात. यामुळे आंबा उत्पादकांना नुकसान सोसावे लागते. यासाठी अतिघन लागवड तंत्राने झाडांची संख्या वाढवण्यात आली. नवीन तंत्रज्ञानामुळे लवकर मोहर आला आहे. यंदा पावसाळ्याच्या सुरवातीलाच चांगला पाऊस झाला नंतर खंड पडला. यंदा जूनमध्येच नवती आली आणि मोहर लागला.

ऑक्टोबरमध्ये पुन्हा पाऊस झाला आणि जिथे मोहोर नव्हता, त्या फांद्यांनाही मोहर आणि फलधारणा झाली. यामुळे यंदा २० ते २५ मार्चपासून काही ठिकाणी आंबा काढणीला सुरवात होईल. आता शेतकऱ्यांनी फळगळ रोखण्यासाठी, भुरी व तुडतुड्याच्या नियंत्रणासाठी वेळापत्रकानुसार फवारण्या कराव्या लागणार आहेत. यंदा केशर शेतकऱ्यांना भाव चांगला देईल आणि निर्यातदेखील वाढेल. यातून शेतकऱ्यांना चांगला फायदा होईल’’, असा विश्वास डॉ. कापसे यांनी व्यक्त केला.

दैनिक
मराठवाडा पत्र
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)


संपादकीय

## महाराष्ट्रातील धृतराष्ट्र

शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाचे नेते विनोद घोसाळकर यांचा मुलगा आणि माजी नगरसेवक अभिषेक यांचा खून केल्यानंतर तो करणारा मॉरिस नरोन्हा याने आत्महत्या केली. त्यामुळे, या प्रकरणाच्या तपासाला काही मर्यादा पडणार आहेत.

गेल्या काही दिवसांत महाराष्ट्रात झालेला खूनखराबा म्हणजे महाराष्ट्राची एकंदरीत वाटचाल कशी चालली आहे; याचे निदर्शक आहे. ही काही नवी घडामोड नाही. महाराष्ट्रातील आणि विशेषकरून मुंबईतील राजकीय नेत्यांनी, पक्षांनी आणि संघटनांनी प्रभुत्व वाढविण्यासाठी अधोविश्व म्हणजे अंडरवर्ल्डचा जो हात अनेक दशकांपूर्वी हातात घेतला; त्याची ही विषारी फळे आहेत. शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाचे नेते विनोद घोसाळकर यांचा मुलगा आणि माजी नगरसेवक अभिषेक यांचा खून केल्यानंतर तो करणारा मॉरिस नरोन्हा याने आत्महत्या केली. त्यामुळे, या प्रकरणाच्या तपासाला काही मर्यादा पडणार आहेत. मॉरिसभाई या नावाने ओळखला जाणारा हा इसम कार्यकर्ता कम गुंड असावा. त्याच्यावर आधीही गुन्हे दाखल आहेत. तो निवडणूक लढविण्यासाठी आम आदमी पक्षासहित कुठेही जायला तयार होता, असे सांगितले जाते. राजकारण आणि गुन्हेगारी ही कशी जुळी भावंडे झाली आहेत, हे यावरून लक्षात यावे. मॉरिसने वापरलेले पिस्तुल कुण्या सुरक्षा रक्षकाचे आहे. त्याची नोंदणी आणि खरेदी इतर राज्यात आहे. काही भाजप नेते याला उद्धव ठाकरे यांच्या पक्षातले गँग वॉर म्हणत असले तरी त्यांनी तोंड वर करून बोलण्याचे काही कारण नाही. काही दिवसांपूर्वी शिंदे सेनेच्या कार्यकर्त्यावर भर पोलिस ठाण्यात गोळीबार झाला; तेव्हा ते पिस्तुल भाजप आमदाराच्या हातात होते. तेव्हाचा तो संघर्ष काय वैचारिक किंवा राष्ट्रवादावरील चर्चेतून उद्भवला होता काय?

सगळे राजकीय पक्ष गुंडांच्या टोळ्या पाळून आहेत. त्या त्यांना निवडणुकीत तर लागतातच पण एरवीही लागतात. पुण्यात काही दिवसांपूर्वी शरद मोहोळ या गुंडाचा खून झाला. त्यानंतर एका ज्येष्ठ मंत्र्याने 'पण गुंडानेच गुंडाचा काटा काढला ना..' असे मानभावी उद्गार काढले. असे गुंडांनीच गुंडांचे काटे काढून गँगवॉर चालवायचे असेल तर पोलिस दल कशासाठी आहे? हा पुण्यात ठार झालेला गुंड अनेक नेत्यांसोबत फोटोत दिसतो. ते नेत्यांना अडचणीचे होते. तेव्हा आता पुणे, नागपूर येथे गुंडांचे मेळावे घेऊन त्यांना सुका दम देण्याचे कार्यक्रम पोलिस खात्याने सुरू केले. या इतका दुसरा बावळट उद्योग नसेल. ज्यांना या मेळाव्यांचे निमंत्रण आले असेल त्यांचे समाजातील वजन वाढल्याशिवाय कसे राहील? शिवाय, यातल्या 'पराक्रमी पुरुषां'ची राजकीय नेते मदत मागतील, तेव्हा पोलिस खाते काय करेल?

सध्याच्या सरकारवर विरोधकांनी तोंड सोडले आहे. ते योग्य आहे. राज्य सरकारने पिस्तुलांचे परवाने, त्यांचे नूतनीकरण किंवा इतर राज्यांमधील शस्त्रांचा सुळसुळाट याकडे गंभीर लक्ष दिलेले नाही. खरेतर, राज्यातले सगळे खासगी शस्त्रपरवाने तातडीने रद्द करून शस्त्रे पोलिसांकडे जमा करावीत. त्यानंतर धोका आजमावून अत्यंत गरजेचे असेल तरच परवाने द्यावेत. नेत्यांना पिस्तुल परवाने म्हणजे दागिना वाटतो. एक मंत्री कमरेला पिस्तुल लावून मुलांच्या कार्यक्रमात गेल्याचे राज्याने पाहिले होतेच.

# मोची पिंपळगावच्या शिक्षिका श्रीम.निर्मला हाडे (धुमरे) सेवानिवृत्त

## शिक्षक हा कधीच निवृत्त होत नसतो, शिक्षण ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे... डॉ. ज्योतीताई मेटे




बीड : मोची पिंपळगाव येथील जि.प.प्रा.शाळेतील शिक्षीका श्रीम.निर्मला हाडे (घुमरे) या नियत वयोमानानुसार नुकत्याच सेवानिवृत्त झाल्या आहेत. त्यांचे बंधू अनिल घुमरे यांच्यावतीने सेवानिवृत्ती गौरव सोहळा हॉटेल नीलकमल,नगर रोड,बीड येथे आयोजित केला गेला होता. सोबतच नुकतेच सेवानिवृत्त झालेले श्री.दिलीप तात्यासाहेब बावळे (उपअभियंता) व प्रा.भरत सदाशिव जगताप यांचाही गौरव घुमरे परिवाराच्या वतीने यावेळी करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून राज्याच्या सहकारी संस्थेच्या अप्पर निबंधक डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटे तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री प्रा.सुरेशरावजी नवले हे होते. माजी नगराध्यक्ष शिवलाल मुळूक,भारतीय संग्राम परिषदेचे जिल्हध्यक्ष प्रभाकरअप्पा कोलंगडे, शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष नारायणदादा काशीद,नितीनजी लाटकर साहेब , कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक श्री.विश्वासजी आखाडे, उद्योजक प्रदीपजी चितलांगे, शिवसंग्राम महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष ड. मनिषाताई कुपकर,सुलभाताई चव्हाण, सुमित्राताई आडसूळ हे उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रस्तावीक शिवसंग्रामचे जिल्हा सरचिटणीस अनिलभाऊ घुमरे यांनी केले. प्रस्ताविक भाषणात त्यांनी आपल्या बहिणीचा सेवा गौरव करताना सांगितले की, शिक्षकी पेशासाठी आवश्यक असलेले सर्व गुणसंपन्न अशा श्रीमती निर्मला हाडे असून आज सेवानिवृत्तीच्या दिवशीही शाळा सुटेपर्यंत अध्ययनाचे काम त्यांनी केले. अतिशय शांत संयमी व सुस्वाभावी मदत करण्याची भावना असणारे व्यक्तिमत्व आज सेवानिवृत्त होत आहे. आयुष्यातल्या चढउतारास न घाबरता समर्थपणे तोंड देणाऱ्या माझ्या भगिनीचा मला अभिमान असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.यावेळी प्रमुख पाहुणे असलेले माजी मंत्री प्रा. सुरेशराव नवले यांनी सांगितले की,आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या मोहजालामुळे अनेक आव्हाने निर्माण झालेली आहेत. मुलांचे पालक हे मुलांचे पहिले शिक्षक असतील, तर शिक्षक हे मुलांचे दुसरे पालक आहेत.आधुनिक युगात विद्यार्थ्यांच्या जडणघडणीसाठी शिक्षकाचे महत्त्व किती मोलाचे आहे हे सांगत असताना घुमरे परिवारांचा असलेला स्नेह व स्वानुभव त्यांनी कथन केले. आदरणीय डॉ. ज्योतीताई मेटे यांनी अध्यक्षीय समारोप करताना सांगितले की,शिक्षक हा कधीच निवृत्त होत नसतो, शिक्षण ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे अखंड ज्ञानावर माझी श्रद्धा आहे. विद्यार्थ्यांना ज्ञान देण्याचे काम शिक्षक करत असतो. शिक्षक म्हणजे ज्ञानाची विहीर व विद्यार्थी म्हणजे विहिरीबाहेर असलेला पोहरा आहे. ज्ञानाने विहीर भरलेली असेल तरच विद्यार्थ्यांच्या पोहऱ्यात ज्ञान मिळू शकेल, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.तसेच एक स्त्रीच तिच्या आयुष्यात संघर्ष करुन यश प्राप्त करु शकते हे स्त्रीचे महत्व सांगीतले व श्रीमती निर्मला हाडे - घुमरे यांना पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सुत्रसंचालन वरवटीचे ज्ञानेश्वर कोटूळे यांनी केले तर आभार प्रदर्शन शिवसंग्रामचे युवा नेते मनोज जाधव यांनी केले.

## आरोग्य सेवक बाजीराव चव्हाण यांच्यावतीने खासदार श्रीकांत जी शिंदे यांचा वाढदिवस

# सामाजिक उपक्रमांनी साजरा !

### शैक्षणिक साहित्य व अनाथ आश्रमात जेवनाचे वाटप



बीड ।प्रतिनिधी

संसदरत्न, लोकप्रिय खासदार श्रीकांत शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त बीड जिल्ह्यात आरोग्यदूत बाजीराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात आले. गेवराई येथील सहारा अनाथालयात जेवणाचे वाटप तर विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करत खा. श्रीकांत शिंदे यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यात आरोग्य सेवेच्या माध्यमातून सामान्याचे आरोग्यदूत बनलेले बाजीराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तरुण तडफदार खासदार श्रीकांत शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त सहारा अनाथालयात जेवणाचे वाटप करण्यात आले. गरजवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करत खासदार शिंदे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला .यावेळी शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष जिल्हाप्रमुख महादेव मातकर,डॉ ज्ञानेश्वर जाधव, निखिल मस्के, मसुराम कदम, अरुण घुमरे, संदीप माने, संकेत पवार, विलास मस्के,कृष्णा यादव,विश्वनाथ जाधव, विश्वास चव्हाण, पंकज कदम,नारायण सपकाळ, शुभम पिंगळे,विलास सातपुते,नरेश चौरे,महेश साळुंके,किरण मस्के, हनुमान कारगुडे,धर्मवीर प्रतिष्ठान व शिवसेना वैद्यकीय मदत पक्षाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते .




# मुफ्ती सलमान अजहरी यांच्यावरील कारवाई वापस घ्या

माजलगाव ।प्रतिनिधी

मुस्लिम धर्मगुरू मुफ्ती सलमान अजहरी यांच्यावरील बेकायदा कारवाई करण्यात आली. याच्या निषेधार्थ माजलगाव तहसील कार्यालयावर मुस्लिम समाजाच्या वतीने दि ०९ फेब्रुवारी शुक्रवार रोजी दुपारी ३:०० वाजता निषेध मोर्चा काढत; कारवाई माघे घेण्यात यावी अशी मागणी करण्यात आली.मुस्लिम समाजाने यासंदर्भात तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, वास्तविक मुफ्ती सलमान अजहरी यांनी कुण्या धर्म, कुण्या व्यक्तीचा नामोल्लेख केला नाही. मात्र केवळ मुस्लिम समाजाच्या द्वेष हेतूने त्यांच्यावर कारवाई करण्याचे काम गुजरात एटीएस,महाराष्ट्र एटीएस कडून करण्यात आले. मुस्लिम समाजाचे धर्मगुरू मुफ्ती सलमान अजहरी यांना चार दिवसापूर्वी गुजरात एटीएस कडून आक्षेपार्ह विधान केल्याचा ठपका ठेवत कारवाई करत अटक करण्यात आली होती.यामुळे माजलगाव येथे मुस्लिम समाजाच्या वतीने मुफ्ती सलमान अजहरी यांच्यावर बेकायदेशीर रित्या करण्यात आलेली कारवाई वापस घेण्यात यावी.या मागणीसाठी दि.०९ फेब्रुवारी शुक्रवार रोजी तहसील कार्यालयावर निषेध मोर्चा काढला.या मोर्चामध्ये हजारो मुस्लिम समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी होते.

### आष्टीच्या शिरपेचात मानाचा तुरा च्या जागतिक विमा परिषदेसाठी

# आष्टी येथील शेख अतीक सर यांची निवड




**आष्टी ।प्रतिनिधी**

**एलआयसीच्या जागतिक विमा परिषदे साठी आष्टी येथील श्री शेख अतीक सर यांची निवड झाली आहे . अमेरिका येथे होत असलेल्या जागतिक विमा परिषद साठी त्यांची निवड झाल्याबद्दल पुणे येथील कार्यक्रमात त्यांचा सन्मान करण्यात आला .**

विमा क्षेत्रातील प्रतिष्ठेचा जागतिक बहुमान चऊळढ (अमेरिका ) २०२४ या पुरस्काराने शेख अतीक सर यांना पुणे डिव्हिजनचे सीनियर डिव्हिजन मॅनेजर श्री मोघे साहेब यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले आहे . यावेळी डखउ चे मार्केटिंग मॅनेजर सुदुंबेकर साहेब , जवळेकर साहेब , अहमदनगर शाखा प्रबंधक श्री कटके साहेब , जामखेड शाखेचे ब्रँच मॅनेजर गणेश औटी साहेब , विकास अधिकारी प्रसाद पोतदार साहेब आदी मान्यवर उपस्थित होते .

शेख अतीक सर हे गेल्या १८ वर्षांपासुन डखउ ची सेवा देत आहेत . त्यांच्या उत्कृष्ट सेवे बद्दल डखउ कंपनीने त्यांचा यथोचित सन्मान केल्याची भावना त्यांच्या ग्राहकामधून व्यक्त होत आहे . त्यांच्या या यशाबद्दल आमदार सुरेश (आण्णा) धस , आमदार बाळासाहेब आजबे , तसेच आष्टी 'कडा , जामखेड , धानोरा , धामणगाव , पिंपरखेड , सराटे वडगाव , सांगवी पाटण आदी ठिकाणातील राजकिय, सामाजिक,धार्मिक , व्यापारी वर्ग तसेच मित्रपरिवाराने त्यांचे अभिनंदन केले, आहे यावेळी बोलताना अतिक सर म्हणाले की जागतीक क्रमवारीत डखउ चा चौथा क्रमांक आहे तर भारतामध्ये डखउ चा विमा क्षेत्रात प्रथम क्रमांक आहे . तसेच हा सन्मान त्यांनी त्यांच्या ग्राहकांना समर्पित करत असल्याचे सांगीतले .



# माजलगावात धर्मनाथ बीजी महोत्सवाचे आयोजन

माजलगाव ।प्रतिनिधी

येथील ग्रामदैवत श्री धर्मनाथ मंदिर धर्मराज कडा बायपास रोड येथे प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी धर्मनाथ बीज महोत्सव निमित्त ११ फेब्रुवारी २०२४ रविवार रोजी सकाळी ६ ते ९ अभिषेक आणि सकाळी ९ ते ११ या वेळेत ९०० नवनाथ पारायण आणि नंतर महाआरती व महाप्रसादाचे आयोजन केले तरी पंचक्रोषीतील भाविक भक्तानी लाभ घ्यावा. असे आवाहन राजेभाऊ कुमावत, अच्युतराव लाटे, मारोतराव सावंत, रामेश्वर जमदाडे, रामभाऊ दराडे, दत्ता येवले, राम भोले,पप्पू डुकरे, बंजरग कुमावत,अभिजित गीलानकर,मुंकुद जोगडे, सिध्दार्थ साळवे,बालाजी कुमावत यांनी केले आहे

# हुकूमनाम्या आधारे सातबारा पत्रकास शेतकऱ्यांची नावे नोंदवा

**माजलगाव ।प्रतिनिधी**

**जिल्हाधिकारी बीड यांच्यासह तहसीलदार माजलगाव यांनी बार्शी बार असोसिएशन विरुद्ध महाराष्ट्र शासन या प्रकरणात दिलेली माननीय उच्च न्यायालयाची मार्गदर्शक तत्त्वे विचारात घेऊन तडजोडीच्या हुकूमनाम्या आधारे सातबारा पत्रकास शेतकऱ्यांच्या नावे फेरफार घेण्याबाबत तलाठी, मंडळ अधिकारी यांना आदेश देण्याची मागणी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ड नारायण गोले पाटील यांनी केली आहे.**

बीड जिल्ह्यातील तलाठी, मंडळ अधिकारी हे मनमानी करत असून अनेक तलाठी व मंडळ अधिकारी केवळ शंभर रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर मनमानीपणे शेतकऱ्यास लुटून वाटणीचा फेर करतात याबाबत वरिष्ठ अधिकारी हे जाणीवपूर्वक डोळेझाक करत आहेत करिता तहसीलदार माजलगाव यांनी माननीय उच्च न्यायालयाने बार्शी बार ओसोसिएशन विरुद्ध महाराष्ट्र शासन या प्रकरणात केलेल्या आदेशान्वये तडजोडीच्या हुकुमनाम्यावर स्टॅम्प ड्युटी न घेता सातबारा पत्रकास शेतकऱ्यांच्या नावे फेरफार घेण्याचा आदेश तलाठी, मंडळ अधिकारी यांना लेखी स्वरूपात देण्याची मागणी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने आठ फेब्रुवारी रोजी तहसीलदार माजलगाव यांना निवेदनाद्वारे केली असून तलाठी, मंडळ अधिकारी हे शंभर रुपयांच्या बॉण्डवर शेतकऱ्याकडून अडवून मनमानीपणे पैसे घेऊन फेरफार करतात त्यावेळी स्टॅम्प ड्युटी लागत नाही परंतु तडजोडीच्या हुकूमनाम्या आधारे फेर लावण्यासाठी स्टॅम्प ड्युटी सक्तीची असल्याचे सांगून शेतकऱ्यांना नाहक त्रास देत आहेत तरी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनी याप्रकरणी लक्ष घालून माननीय उच्च न्यायालयाने बार्शी बार असोसिएशन विरुद्ध महाराष्ट्र शासन या प्रकरणात दिलेले मार्गदर्शक तत्वे विचारात घेऊन तडजोडीच्या हुकूम नाम्यावर स्टॅम्प ड्युटी न घेता सातबारा पत्रकास शेतकऱ्यांचे नावे नोंदवण्याबाबत तलाठी मंडळ अधिकारी यांना लेखी आदेशित करण्यात यावे अन्यथा शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ड.नारायण गोले पाटील, यांच्यासह ऍड प्रवीण अंबुरे, ऍड सुधीर लिमगावकर, ड.हिंगण, ऍड.विलास देशमुख, अँड अजित जगताप, ड.अमोल डोंगरे यांच्यासह आदी विधीज्ञासह त्रस्त शेतकर्यांनी दिला आहे.



भाई ॲड.नारायण गोले पाटील

# पालकांनी विद्यार्थ्यांचे मित्र व्हाव :- ॲड संगीता धसे

**संस्कार विद्यालय बीड येथे विद्यार्थांना कायदेविषयक मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते , यावेळी शाळेचे मुख्याध्यापक गंदेसर, जिल्हा सह सरकारी वकील अनील धसे , ड संगीता धसे ,ड लीना फड , मुख्याध्यापक जाधवताई तसेच सर्व शिक्षकवृंद आणि विद्यार्थी वर्ग उपस्थित होते,**

सदर कार्यक्रमात ड संगीता धसे यांनी कायदेविषयक मार्गदर्शन करताना अनेक उदाहरणं देऊन मुलांना अनेक कायद्याची माहिती दिली, पोक्सो कायदा किती गंभीर स्वरूपाचा आहे आणि त्या कायद्याचे वाईट परिणाम कसे होतात त्यामध्ये विद्यार्थी वर्गाला या कायद्याचे ज्ञान असने आवश्यक आहे, वयात येणारे मूल मूली यांच्यात मोबाईल इंटरनेट व सोशल मीडिया च्या माध्यमातून चुकीचे अनुकरन करणे, चुकीचे चित्रीकरण पाहणे, आभ्यासाचा नावा खाली मोबाईलचा होणारा चुकीचा वापर यामुळे १२,१३ वर्षाची मूल मूली वेगळ्या पद्धतीने अनुकरण करू लागले, धकाधकीच्या आयुष्यात पालकांना मुलां कडे लक्ष देण्यासाठी वेळ नाही, किशोर वयात मुलांना आईवडीलांच्या संवादाची गरज असते आणि नेमक्या याच वयात पालक त्यांच्या कडे बऱ्यापैकी दुर्लक्षीत होतात, म्हणून छोटी छोटी मूल मूली पळून जातात वेगवेगळ्या गुन्हयात गुंतले जातात, अज्ञान वयात चुकीचे पाऊल उचलल्या जाऊ नये त्या मूलान मध्ये कायदा याची जनजागृती व्हावी यासाठी संस्कार विद्यालय बीड यानी या व्याख्यानाचे आयोजन केल होत यावेळी संस्कार विद्यालयातील दोन्ही सत्रातील विद्यार्थी उपस्थित होत , बऱ्याच विद्याथ्यार्थी वर्गाने चर्चात्मक प्रश्न विचारून शंकेचे निरसन करून घेतले .



# सरावासाठी सचिन धस यांच्या वडिलांनी पाडले होते जुने घर

## बीड जिल्ह्यातील या क्रिकेटपटूने चौथ्या वर्षीच हाती घेतली बॅट



प्रतिनिधी बीड

१९ वर्षांखालील क्रिकेट विश्वचषकात ६ फेब्रुवारी रोजी झालेल्या सेमीफायनलमध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध संघ अडचणीत असताना ९६ धावा केल्याने बीडचा भूमिपुत्र सचिन धस चर्चेत आला. वयाच्या चौथ्या वर्षापासून क्रिकेट खेळणारा सचिन शाळा सुटण्याच्या एक तास आधीच घरी येऊन सरावाला जायचा. राहिलेला अभ्यास बहीण व आई पूर्ण करायच्या. ५ वर्षांपासून रोज ३ सत्रांत ८ तास सराव व तंदुरुस्तीसाठी १ तास व्यायाम करायचा. रात्रीच्या वेळी सराव करता यावा यासाठी वडिलांनी त्यांचे जुने घर पाडून तिथे इनडोअर प्रॅक्टिसची सुविधा केली होती. या मेहनतीचे फळ म्हणून आज सचिन विश्वचषकात चमकला आहे.

सध्या सुरू असलेल्या विश्वचषकात त्याला सुरुवातीच्या सामन्यांमध्ये उशिराने संधी मिळाली. सुपर सिक्समध्ये नेपाळविरुद्ध त्याने ११६ धावांची मोठी खेळी केली, तर सेमीफायनलमध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध संघ अडचणीत असताना ९६ धावा केल्या. क्रिकेटप्रेमी असलेले त्याचे वडील संजय धस यांनी सचिन ४ वर्षांचा असतानाच त्याला क्रिकेट प्रशिक्षण द्यायला सुरुवात केली. बीड येथील क्रिकेट प्रशिक्षक अजहर शेख यांच्याकडे तो प्रशिक्षण घेतो. आदर्श क्रिकेट क्लबमध्ये तो सराव करतो. वयाच्या १० व्या वर्षीच त्याची प्रचंड मेहनतीच्या जोरावर त्याची १२ वर्षांखालील क्रिकेट संघात निवड झाली. जिल्हा, विभाग, राज्य आणि देशपातळी अशा चढत्या क्रमाने तो खेळत गेला.

---

**जाहीर प्रगटन**
**मा.श्री.आर.जी.बागडे साहेब, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज २३३/२०२४**
**हिराबाई विरूध्द निरंक**
**अर्जदार – १. श्रीमती. हिराबाई प्र. बन्सी कोळेकर, वय–५९ वर्षे, धंदा – घरकाम,रा. बहादरपुर ता. जि. बीड.**
**२. श्री. बाबु पि. बन्सी कोळेकर, वय–४० वर्षे, धंदा – शेती, रा. बहादरपुर ता. जि. बीड.**
**३. फुलचंद पि. बन्सी कोळेकर, वय–३० वर्षे, धंदा – शेती,रा. बहादरपुर ता. जि. बीड.**
**४. रत्नमाला पि. बन्सी कोळेकर, वय–३३ वर्षे, धंदा घरकाम, रा. बहादरपुर ता. जि. बीड.**
**५. सत्यशिला पि. बन्सी कोळेकर, वय–३१ वर्षे, धंदा घरकाम, रा. बहादरपुर ता. जि. बीड.**
**६. कांता भ्र. शंकर लाटे, वय–४१ वर्षे, धंदा घरकाम, रा. चिंचोलीफाटा ता. राहूरी जि. अहमदनगर.**
**७. गंधारी प्र. हनुमंत करगळ, वय–३६ वर्षे, धंदा घरकाम, रा. डुक्करवाडी, ता. जि. बीड.**
**विरुध्द**
**निरंक**
**मागणी : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत कै. बन्सी काशीनाथ कोळेकर मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत कै. बन्सी काशीनाथ कोळेकर यांचा मृत्यु दिनांक ३०/१२/२०२० रोजी झाला आहे. वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत कै. बन्सी काशीनाथ कोळेकर यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत कै. बन्सी काशीनाथ कोळेकर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०९/०२/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयायचे शिक्क्याने दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १६/०३/२०२४ आहे.

शिक्का
आदेशावरून
स्वाक्षरित/–
अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड

---

**जाहीर प्रगटन**
**मा. श्री. ए. एम. फडतरे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १८८/२०२४**
**ॲड. लाखे एल. एस.**
**अर्जदार**
**१) सुरेखा रमेश घोडके, वय–३५ वर्षे, धंदा–मजुरी व घरकाम, रा. एमआयडीसी, पावरलूम रोड, बीड ता. जि. बीड**
**२) आदित्य रमेश घोडके अ.पा.क. आई सुरेखा रमेश घोडके, वय–१५ वर्षे, धंदा–शिक्षण, रा. एमआयडीसी, पावरलूम रोड, बीड ता. जि. बीड**
**३) आस्वीक रमेश घोडके अ.पा.क. आई सुरेखा रमेश घोडके, वय–१० वर्षे, धंदा–शिक्षण, रा. एमआयडीसी, पावरलूम रोड, बीड ता. जि. बीड**
**४) पार्वतीबाई महादेव घोडके, वय–८१ वर्षे, धंदा–घरकाम, रा. रामतिर्थ नगर, बहिरवाडी, बीड ता. जि. बीड**
**विरुध्द गैरअर्जदार**
**निरंक**
**अर्जदार हे भारतीय आहेत.**
**मागणी : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे रमेश महादेव घोडके यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मयत नामे रमेश महादेव घोडके, रा. रामतिर्थ नगर, बहिरवाडी, बीड, ता. जि. बीड हे दिनांक १६/०५/२०२३ रोजी जिल्हा रुग्णालय, बीड, ता. जि. बीड येथे मयत झालेल्या आहेत. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असुन, अर्जदार क. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार कं. ४ ही मयताची आई आहे. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे इतर कोणीही वारस नाहीत

अर्जदारांचे असेही म्हाणणे आहे की, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास

समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पुढील दिनांक ०५/०३/२०२४

आज दिनांक ३१/०१/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशावरून
स्वाक्षरित/–
अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड

---

**जाहीर प्रगटन**
**मा. आर. डी.गवई, ५वे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १६९५/२०२३**
**अर्जदार:– १. व्दारकाबाई भ्र. मारोती उर्फ बाबासाहेब गाडेकर, वय–५५ वर्षे, धंदा– घरकाम, रा. नाथापुर, ता. जि. बीड**
**२. कृष्णा पि. मारोती उर्फ बाबासाहेब गाडेकर, वय–२५ वर्षे, धंदा–शेती, रा. सदर**
**३. सावता पि. मारोती उर्फ बाबासाहेब गाडेकर, वय–२३ वर्षे, धंदा–शेती, रा. सदर**
**४. अर्चना भ्र, अनिल शिंदे, वय २१ वर्षे, धंदा घरकाम, रा. वडीकाळा, ता. अंबड जि. जालना,**
**विरुध्द निरंक**
**अर्ज:–बॉम्बे रेग्युलेशान ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी मयत मारोती उर्फ बाबासाहेब पि. लिंबाजी गाडेकर यांचा दिनांक २२/०६/२०१७ रोजी नाथापुर, ता. जि. बीड येथे मृत्यु झाला आहे. तसेच वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. तसेच अर्जदार क. ४ ही मयताचौ विवाहीत मुलगी आहे सदर अर्जदारा शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत मारोती उर्फ बाबासाहेब पि. लिंबाजी गाडेकर यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकिय व निमशाकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जमतेस कळविण्यात येते की सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाने असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत न्यांना हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख १८/१०/२०२३

आज दिनांक १० माहे ऑक्टोबर २०२३ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशावरून
स्वाक्षरित/–
अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड

---

**जाहीर प्रगटन**
**मा. श्री. ए. एम. फडतरे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २६०/२०२४**
**ॲड. एस. एस. महाजन**
**अर्जदार**
**१) मिना सुनिल वायकर–कदम, वय–४ वर्षे, धंदा–घरकाम, रा. आहेर लिंबगांव ता. जि. बीड**
**२) माऊली सुनील कदम –अ.पा.क.अर्जदार क्र. १, वय–८ वर्षे, व्यवसाय–शिक्षण, रा.आहेर लिंबागाव ता. जिल्हा. बीड**
**३) पूजा सुनील कदम (विवाहापूर्वीचे नाव), पूजा भ्र. बाळू मोटे (लग्नानंतरचे नाव), वय–२३ वर्षे, व्यवसाय–घरकाम, रा.उदंडवडगाव ता. जिल्हा. बीड**
**विरुध्द गैरअर्जदार निरंक अर्जदार हे भारतीय आहेत.**
**प्रकरण:– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे सुनिल पि. अप्पाराव कदम यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे सुनिल पि. अप्पाराव कदम, रा. आहेर लिंबगांव, ता. जि. बीड हे दिनांक २२/०६/२०२३ रोजी जिल्हा रुग्णालय, बीड येथे मयत झालेल्या आहेत. अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क्र.२ हा मयताचा अज्ञान मुलगा असुन त्याची अ. पा. क. आई अर्जदार क्र.१ ही आहे. अर्जदार क्र. ३ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. मयताचे वडील हे अंदाजे २० वर्षापुर्वी व आई ही अंदाज १५ वर्षापुर्वी मयत झालेली आहे. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे इंतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे

म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन

आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पुढील दिनांक १९/०३/२०२४

आज दिनांक ०८/०२/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्कानिशी दिली.

शिक्का
आदेशावरून
स्वाक्षरित/–
अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड

---

**जाहीर प्रगटन**
**मा. आर. डी.गवई, ५वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**
**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक १६८५/२०२३**
**अर्जदार:– १. व्दारकाबाई भ्र. मारोती उर्फ बाबासाहेब गाडेकर, वय–६७ वर्षे धंदा–घरकाम रा. नाथापुर, ता. जि. बीड.**
**२. कृष्णा पि. मारोती उर्फ बाबासाहेब गाडेकर, वय–२५ वर्षे, धंदा–शेती, रा. सदर ३. सावता पि. मारोती उर्फ बाबासाहेब गाडेकर, वय–२३ वर्षे, धंदा–शेती, रा. सदर**
**४. अर्चना भ्र. अनिल शिंदे, वय–२१ वर्षे, धंदा–घरकाम, रा. वडीकाळा, ता. अंबड, जि. जालना. ५. चंद्रभागा भ्र. राम दिलवाले, वय–७५ वर्षे, धंदा–घरकाम, रा. उमापूर ता. गेवराई, जि. बीड.**
**विरुध्द निरंक**
**अर्ज:–बॉम्बे रेग्युलेशान ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी मयत लिंबा पि. मारोती गाडेकर यांचा दिनांक २९/०८/२००९ रोजी नाथापुर ता. जि. बीड येथे मृत्यु झाला आहे. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क्र.१ ही मयताची सुन आहे. अर्जदार क. २ व ३ हे मयताचे नातू आहेत. तसेच अर्जदार क्र.४ ही मयताची नात आहे. तसेच अर्जदार क. ५ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. सदर अर्जदारां शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत लिंबा पि. मारोती गाडेकर यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकिय व निमशाकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख ०७/१०/२०२३

आज दिनांक ०४ माहे सप्टेंबर २०२३ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशावरून
स्वाक्षरित/–
अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड

---

**जाहीर प्रगटन**
**मा. आर. डी.गवई, ५वे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांच्या न्यायालयात,**
**बीड, ता.जि. बीड**
**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक १८८६/२०२३**
**अर्जदार:–**
**१. रमेश पि. वसंत लांडे, वय–३५ वर्षे, धंदा–शेती, रा. सांडरवन, पो.पिंपळनेर, ता. जि. बीड**
**विरुध्द निरंक**
**अर्ज:– बॉम्बे रेग्युलेशान ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी मयत संदिप पि. यादवराव लांडे यांचा दिनांक ३०/०७/२०२३ रा.सांडरवण, पो. पिंपळनेर, ता. जि. बीड येथे मृत्यु झाला आहे. तसेच वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे अर्जदार हा मयताचा मुलगा आहे. सदर अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस माहीत

मयत संदिप पि.. यादवराव लांडे यांचे मृत्यूनंतर वरील अर्जदार याना निमशाकीय कामासाठी सदर वारम प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयत्तांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत यानी जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कात त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख ०५/०१/२०२४.

आज दिनांक ३१ माहे ऑक्टोबर २०२३ रोजी माझ्या महीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशावरून
स्वाक्षरित/–
अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड

---

महाराष्ट्र शासन
वनविभाग
वन्यजीव विभाग छत्रपती संभाजीनगर
वनपरिक्षेत्र (वन्यजीव) नायगावं

## निविदा सुचना

जा.क्र./वपअ./वजी/436/2023-24, दिनांक:-08/02/2024

वनपरिक्षेत्र (वन्यजीव) नायगांव अंतर्गत असलेल्या नियतक्षेत्रातील खालील कामाकरीता मोहरबंद पध्दतीच्या निविदा (बी-1) मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय कामाची रक्कम | इसारा रक्कम | निविदा फॉर्म किंमत |
|---|---|---|---|---|
| 1 | नायगाव गुरे प्रतिबंधक चर (TCM) खोदणे स. नं. 69, क्षेत्र 15 हेक्टर | 4,59,188/- | 4591/- | 200/- |
| 2 | खडकवाडी गुरे प्रतिबंधक चर (TCM) खोदणे कं. नं. 369 A क्षेत्र 12 हेक्टर | 3,67,351/- | 3673/- | 200/- |
| 3 | डोंगरकिन्ही सलग समपातळी चर (CCT) खोदण स. नं. 74 A क्षेत्र 10 हेक्टर | 6,23,295/- | 6232/- | 200/- |

**अटी व शर्ती-**

1. आवश्यक त्या विभागाचा नोंदणीकृत ठेकेदार निविदा भरण्यास पात्र असेल.
2. अ) कोऱ्या निविदा विक्री दिनांक 12/02/2024 सकाळी 10:00 वाजेपासुन ते दिनांक 20/02/2024 रोजी संध्याकाळी 05:00 वाजेपर्यंत केवळ कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत वनपरिक्षेत्र (वन्यजीव) नायगांव कार्यालयात उपलब्ध होतील.
   ब) मोहरबंद निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक 20/02/2024 रोजी कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत.
   क) निविदा उघडण्याचा दिनांक 21/02/2024 रोजी कार्यालयीन वेळेत किंवा प्रशासकीय सोयीनुसार.
3. निविदा पोटी इसारा रक्कम लेखा विभागात रोखीने भरुन पावतीची मुळ प्रत व ठेकेदाराचे आवश्यक कागदपत्राच्या सत्यप्रती लिफाफा क्र. 01 च्या आत ठेवुन व या लिफाफावर अनामत पावतीचा तपशिल लिहून लिफाफा क्र. 01 व लिफाफा क्र. 02 निविदा सीलबंद करुन वनपरिक्षेत्र (वन्यजीव) कार्यालयात दाखल करावेत.
4. इसारा रक्कमेचा डी. डी. हा कोणत्याही राष्ट्रीयकृत किंवा कोणत्याही शेड्युल बॅकेचा विभागीय वन अधिकारी (वन्यजीव) छत्रपती संभाजीनगर यांचे नावाने सादर करावा.
5. सदर कामाचा कालावधी हा चालु 2023-24 या वर्षाचा असुन सर्व कामे याच वर्षात पुर्ण करणे बंधनकारक राहील.
6. या जाहिरातीबाबत अधिक माहिती वनपरिक्षेत्र (वन्यजीव) नायगांव यांच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आलेली आहे. व अधिकच्या माहितीसाठी या कार्यालयास संपर्क करावा.
7. प्राप्त निविदा पैकी कोणतीही निविदा स्विकारणे अथवा सर्व निविदा नाकारण्याचे अधिकार वन्यजीव वनविभाग छत्रपती संभाजीनगर यांनी राखुन ठेवला आहे. याची कारणे दिली जाणार नाहीत.

सही/-
वनपरिक्षेत्र अधिकारी,
(वन्यजीव) नायगांव.

---

# धमकी आली म्हणून घरी बसणार नाही

## काहीही झाले तरी भूमिकेवर ठाम, मंत्री छगन भुजबळांची प्रतिक्रिया, पोलिसांत दिली तक्रार



**नाशिक / प्रतिनिधी**

**काहीही झाला तरी भूमिका सोडणार नाही. जीवे मारण्याची धमकी आली म्हणून घरी बसणार नाही असे विधान राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी केले आहे. छगन भुजबळ यांना शुक्रवारी पत्राद्वारे जीवे मारण्याची धमकी देण्यात आली होती. याप्रकरणीच त्यांनी प्रतिक्रिया दिली आहे. छगन भुजबळ यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली असून संबंधित पत्रही पोलिसांना स्वाधीन केले आहे.**

अनेकदा धमकी आली, मारण्याचा प्रयत्नही झाला- भुजबळ

मंत्री छगन भुजबळ यांना धमकीचे पत्र आल्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले की, ''आतापर्यंत फोन आणि मेसेज तर खूप आले. परंतु आता पत्रही आले आहे. आयुष्यात असे अनेक प्रसंग आले आहेत. परंतु काहीही झाले तरी मी माझी भूमिका, माझी आयडॉलॉजी सोडणार नाही. मी घरी बसू शकत नाही. जे परिणाम होतील, त्यासाठी आपली तयारी आहे. आता पोलिसांवर सर्व सोडून दिले आहे. पोलिसांना सर्व माहिती दिली असून पोलिस शोध घेतील'', असे भुजबळ यांनी म्हंटले आहे.दरम्यान, भुजबळ यांना प्राप्त झालेल्या पत्रात काही फोन नंबर पण देण्यात आले आहेत. तसेच काही गाड्यांचे नंबरही दिले आहे. हत्येच्या कटासाठी पाच लोकांची बैठक झाली. ही बैठक ज्या हॉटेलसमोर झाली त्याचीही माहिती पत्रात आहे. आता सर्व काही पोलिसांवर सोपवले आहे, अशी माहिती भुजबळ यांनी दिली.

या पत्रात मंत्री छगन भुजबळ यांच्या जीवाला धोका असल्याचे सांगण्यात आले आहे. तसेच भुजबळ यांना जीवे मारण्याची धमकी पाच जणांनी घेतल्याचा उल्लेखही या पत्रात करण्यात आला आहे. त्यासोबतच हे पाचही जण सध्या भुजबळांच्या शोधात आहेत. ते केव्हाही त्यांना जीवे मारू शकतात. हे पाचही जण ज्यांनी भुजबळ यांची सुपारी घेतली आहे. ते सध्या गंगापूर दिंडोरी चांदशी येथील हॉटेलमध्ये बसून असल्याचेही या पत्रात नमूद करण्यात आले आहे. या पाचही जणांना ५० लाख रुपयांना मंत्री छगन भुजबळ यांची सुपारी देण्यात आली आहे.

दैनिक • महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे



## वैद्यकीय मदतीचा हात म्हणजे एकनाथ

# शिवसेनेच्या महा रक्त तपासणी शिबिराचा शेकडो नागरिकांना लाभ

परळी / प्रतिनिधी

शिवसेनेचे मुख्य नेते तथा महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा. ना. एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बाबा रामदेव मंदिर गाणेशपार रोड याठिकाणी परळी शिवसेनेच्या वतीने महा रक्त तपासणी शिबिराचे शिवसेना नेते व्यंकटेश शिंदे, शहर प्रमुख वैजनाथ माने यांनी आयोजन केले होते.



८०% समाजकारण व फक्त २०% राजकारण अशी ओळख असलेल्या शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराना असा उपक्रम राबवून एकप्रकारे त्यांच्या विचारांचा गौरव केल्याची भावना यावेळी उपस्थित अनेक नागरिकांनी व्यक्त केली. याप्रसंगी वैद्यकीय अधीक्षक डॉ. अरुण गुट्टे, वैद्यकीय अधिकारी डॉ. नौसीन शेख, वैज्ञानिक अधिकारी संजय नागरगोजे, गिताजी चव्हाण यांच्या सह महा लॅब चे सचिन गर्जे, प्रल्हाद आंधळे, अविनाश व्हावळे, कृष्णा आंधळे (एलसी) विश्वास सूर्यवंशी, अक्षदा सोळंके यांच्या सह सर्व कर्मचारी उपस्थित होते. महा रक्त तपासणी शिबिरा अंतर्गत रक्तातील साखर, रक्ताचे प्रमाण, कावीळ, किडनी, थायरॉईड, यासारख्या खर्चिक रक्त तपासण्या मोफत करण्यात आल्या.

विकास कामा बरोबरच नागरिकांच्या आरोग्य सुविधेबाबतीत नेहमीच सतर्क असणाऱ्या व मुख्यमंत्री सहायता निधी व शिवसेनेच्या वैद्यकीय मदत कक्ष च्या माध्यमातून लाखों रुग्णांना आर्थिक मदत करणारे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसा निमित्त शिवसेनेच्या वतीने महा रक्त तपासणी शिबिराचे आयोजन करून अनेक नागरिकांची मोफत रक्त तपासणी करण्यात आली.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवसेना नेते व्यंकटेश शिंदे, शहर प्रमुख वैजनाथ माने, महिला आघाडी तालुकाप्रमुख यशोदा राठोड, मोहीनी काबंळे, संतोष चौधरी, मोहन राजमाने, तुकाराम नरवाडे, बाबा सोनवणे, सुदर्शन यादव, अमोल गायकवाड, अनिल शिंदे, बाळासाहेब खोसे, सचिन सोनवणे, राजेश शिंदे, विश्वनाथ पंजरकर, विठल गायकवाड, गोविंद शिंदे, मुंजा गायकवाड, गौरव क्षीरसागर, अतिश दहातोंडे गोविंद गरड, अरुण माने, विशाल गावडे, विशाल शिंदे, विकास राऊत, निलेश बोटुळे, नरसिंग पौळ यांनी परिश्रम घेतले.

## आज पासून मुंडेवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह

**कंधार । प्रतिनिधी**

**कंधार तालुक्यातील मुंडेवाडी येथे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी मि.पौ.शु १ शके १९४५ दि.१० फेब्रुवारी रोज शनिवार पासून अखंड हरिनाम सप्ताहस प्रारंभ होणार आहे.तसेच सांगता माघ शु.शके १९४५ दि.१७ फेब्रुवारी २०२४ रोज शनिवार पर्यत आयोजित केला आहे.**

काल्याच्या किर्तनानंतर महाप्रसादाने या सप्ताहाचा सांगता होणार आहे.तसेच कंधार तालूक्यातील पंचक्रोशीतील भाविकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन सप्ताह कमिटीच्या वतीने प्रसिद्धी पत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

या सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रमाची रूपरेषा पुढील प्रमाणे आहे,पहाटे ४ ते ६ काकड आरती भजन,सकाळी ६ ते १० ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी ११ ते १ गाथा भजन . दुपारी १ ते ३ भावार्थ रामायण लक्ष्मणशक्तीचा रोज एक आद्याय सर्व वाचक सुचक मंडळी सायंकाळी ४ ते ५ प्रवचन, ५ ते ६ हरिपाठ, रात्री ९ ते ११ हरि किर्तन,रात्री १२ ते ४ हरि जागर भजन,किर्तनकार म्हणून ह.भ.प श्री पंढरी महाराज मुरकुटे नांदेड ह.भ.प कु.शितलताई चोले ह.भ.प श्री विठ्ठल महाराज उमरीकर ह.भ.प श्री भगवान महाराज ईसादकर ह.भ.प कु. मोनिकाताई खाडे अळंदी ह.भ.प श्री कृष्णभक्त गणेश महाराज गुट्टे परळी ह.भ.प श्री वासुदेव महाराज मुंडे शास्त्री गोपीनाथ गड परळी काल्याचे किर्तनकार ह.भ.प श्री वासुदेव महाराज मुंडे शास्त्री गोपीनाथ गड परळी यांची उपस्थिती राहणार आहे.या सप्ताहात कंधार तालुक्यातील पंचक्रोशितील भजनी मंडळ उपस्थित राहणार आहेत.या कार्यक्रमाचा लाभ मोठ्या संख्येने घ्यावा असे आव्हान सप्ताह कमिटी मुंडेवाडी ता.कंधार यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## आशा स्वयंसेविकांच्या पाठीशी ' जिजाऊ ' संघटना

मुंबई /प्रतिनिधी

आशा स्वयंसेविकांच्या विविध मागण्यांसाठी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयावर शहापूर ते ठाणे अशी पायी पदयात्रा गुरुवारी शहापुरातून सुरू झाली. आज ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर या आशा स्वयंसेविकांनी पोहोचून निदर्शने केली. यावेळी भिवंडी, मुरबाड, शहापूर तालुक्यातील आशा स्वयंसेविका महिला मोठ्या संख्येने या ठिकाणी पोहोचल्या. दरम्यान, आशा स्वयंसेविकांच्या या पदयात्रेला जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्थेने पाठींबा दिला असून परवा शहापुरातून निघालेल्या आशा स्वयंसेविकांना उष्माघाताचा त्रास होवून भिवंडीतील रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यावेळीही जिजाऊच्या कार्यककर्त्यांनी घटनास्थळी आशा स्वयंसेविकांना मदतीचा हात देत त्याच्या औषधोपचारापासून इतर सुविधा पुरविण्यास जिजाऊने पुढाकार घेत आशा स्वयंसेविकांना न्याय मिळेपर्यंत जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्था त्यांच्या सोबत राहिल, असा विश्वास जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे अध्यक्ष निलेश सांबरे यांनी व्यक्त केला आहे.

# तलावाच्या पुलावरुन वहान कोसळून खाली पडल्याने या भिषण अपघातात ५ ठार १ गंभीर तर ४ जण जखमी

## भोकर-उमरी रस्त्यावरील हाळदा-मोघाळी तलावाच्या पुलावरील घटना

**भोकर / प्रतिनिधी**

**येथून उमरीकडे जात असलेल्या वाहनाचे समोरचे टायर फुटल्याने चालकाचा गतीवरील ताबा सुटून झालेल्या अपघातात पाच जण ठार झाले सदरील हे वाहन हाळदा- मोघाळी गावाच्या दरम्यान असलेल्या हळदा तलावाच्या पुलावरुन खाली पडल्याने हा भीषण अपघात झाला. यात पाच जणांचा मृत्यू झाला असून इतर पाच जण गंभीर जखमी झाले आहेत जखमींना पुढील उपचारासाठी नांदेड येथे पाठवण्यात आले आहे**

सविस्तर वृत्त असे कि भोकर येथील नातेवाईकांच्या घरी कार्यक्रम आटोपून काल दि ८ रोजी रात्री ११ वाजताच्या दरम्यान तेलंगणाकडे वाहनाने जात असतांना वाहनाचे समोरचे चाक फुटल्याने चालकाचा वाहनावरील ताबा सुटला त्यामुळे भोकर- उमरी रस्त्यावरील हाळदा-मोघाळी दरम्यान असलेल्या हाळदा तलावाच्या पुलावरुन वाहन खाली कोसळले.वाहनातील काही जणांनी आरडाओरड केल्याने जवळच्या शेतात असलेले शेतकरी मदतीसाठी धावून आले त्यांनी या भीषण अपघाताची माहिती भोकर पोलीस ठाण्यात कळवल्यानंतर पोलीस निरीक्षक सुभाषचंद्र मारकड, सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्पना राठोड, दिलीप जाधव, संभाजी देवकांबळे,जमादार रवि मुधोळे, परमेश्वर कळणे, लहु राठोड, मंगेश क्षिरसागर यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते जुनेद पटेल, सुलेमान शेख, शाहरुख खान आदी तात्काळ घटनास्थळी पोहचले वाहनात अडकलेल्या बाहेर काढले असता यातील सविता श्याम भालेराव ( वय २५), प्रिती परमेश्वर भालेराव




( वय ८) दोघी रा. रेणापूर ता. भोकर व सुशिल मारोती गायकवाड ( वय ९) रा. रामखडक ता. उमरी या तिघांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले तर गंभीर जखमी झालेल्या रेखाबाई परमेश्वर भालेराव ( वय ३०), अंजनाबाई ज्ञानेश्वर भालेराव ( वय २८), श्याम तुकाराम भालेराव ( वय ३५) तिघे ही रा. रेणापूर ता. भोकर यांना पुढील अधिक उपचारासाठी नांदेड येथे रवाना करण्यात आले असता नांदेड येथील शासकीय रुग्णालयात पोहोचण्यापूर्वी उपरोक्त दोघींचा रस्त्यातच मृत्यू झाल्याचे तेथील डॉक्टरांनी घोषित केले जखमींवर भोकर शासकीय ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी डॉ. सागर रेड्डी परिचारिका संगीता महादळे पौर्णिमा दिपके शिपाई दिनेश लोट या सर्वांनी प्रथमोपचार केले. गंभीर जखमी श्याम तुकाराम भालेराव यांच्यावर नांदेड येथे उपचार सुरु आहेत. तसेच इतर जखमी दत्ता ज्ञानेश्वर भालेराव ( वय ९), प्रितेश परमेश्वर भालेराव ( वय ८), सोहम ज्ञानेश्वर भालेराव ( वय ७), ज्ञानेश्वर तुकाराम भालेराव ( वय २८) सर्वजण रा. रेणापूर ता. भोकर यांच्यावर भोकर येथील शासकीय ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत. सदरील घटनेचा पुढील अधिक तपास पोलीस निरीक्षक सुभाषचंद्र मारकड यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे.अप्पर पोलीस अधीक्षक खंडेराय धरणे यांनी घटनास्थळी भेट दिली यावेळी भोकर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुभाष चंद्र मारकड व अन्य पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

## अंबाजोगाई येथील रविवार पेठ, येथे कुष्ठरोग निर्मूलन जनजागृती




अंबाजोगाई / प्रतिनिधी

मानवलोक समाजकार्य महाविद्यालय अंबाजोगाईच्या 'अ' जीवन शिक्षण व विस्तार विभागाअंतर्गत दिनांक ९ फेब्रुवारी २०२४ रोजी क्षेत्रकार्या अंतर्गत कुष्ठरोग निर्मूलन पंधरवाडा च्या निमित्ताने रविवार पेठ धनगर गल्ली येथे कुष्ठरोग निर्मूलन जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.अ जीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या समन्वयक आणि क्षेत्रकार्याच्या मार्गदर्शक प्रा.डॉ. रमा पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात येत आहे.या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून अवैद्यकीय अधिकारी नागरी रुग्णालय आंबेजोगाई श्रीमती यु.पी गायकवाड तसेच कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून लाभलेल्या मानवलोक समाजकार्य महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. प्रा. रमा पांडे यांची उपस्थिती होती.तसेच कार्यक्रमाला अंगणवाडी क्रमांक ५ मधील अंगणवाडी कार्यकर्त्या बर्डे विमल तसेच अंगणवाडी मदतनीस कस्तुरबाई कुलकर्णी व सर्व महिला यांनी आपला सहभाग नोंदवला.कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभलेल्या यु.पी गायकवाड यांनी उपस्थित सर्व महिलांना कुष्ठरोगांचे लक्षणे व त्यासंदर्भात समाजात असलेला गैरसमज अंधश्रद्धा याविषयी मार्गदर्शन केले.व सर्व महिलांना कुष्ठरोगांविषयी सतर्क राहण्यास सूचना केली. सर्व महिलांकडून कुष्ठरोग निर्मूलन संदर्भातील प्रतिज्ञा घेऊन कार्यक्रमाचे सांगता झाली.या कार्यक्रमाला महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती दाखवली.या कार्यक्रमाचे आयोजन मानवलोक समाजकार्याचे विद्यार्थी यांनी केले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पवन तूपसमुद्रे यांनी केले. तर गीता बंडगर यांनी आभार मानले.

# शैक्षणिक विकास घडवण्यासाठी शिक्षकासोबतच पालकांची जबाबदारी आहे -रणवीर पंडित

## जयभवानी शिक्षण संकूलात माता पालक मेळाव्याला उस्फुर्त प्रतिसाद

गेवराई / प्रतिनिधी

शैक्षणिक विकास घडवण्यासाठी शिक्षकासोबतच पालकांनी हातात हात घालून काम केले पाहिजे. आपला मुलगा कींवा मुलगी ज्या शाळेत शिक्षण घेते त्या शाळेसाठी आई वडीलांनी थोडा तरी वेळ दिला पाहिजे, तरच विद्यार्थी नावारुपाला येतील असा विश्वास शारदा स्पोर्टस करिअर कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांनी केले. जयभवानी विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या माता पालक मेळाव्यात ते बोलत होते.

शिवाजीनगर गढी येथील जयभवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शुक्रवार दि.९ फेब्रुवारी रोजी माता पालक मेळावा व हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शारदा स्पोर्टस अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, राष्ट्रवादी कॉंग्रेस महिला आघाडीच्या तालुका अध्यक्षा सौ. मुक्ताताई आर्दड, सरपंच सौ.अश्विनी काकडे, प्रा. शिंधुताई दाभाडे, सौ. शंकुतला काकडे, डॉ. श्रीमती गिरी, मुख्याध्यापक वसंत राठोड आदी मान्यवर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

पुढे बोलताना रणवीर पंडित म्हणाले की, पालकांनी शाळेकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. विद्यार्थांना वळण लावण्याचे काम शिक्षक आणि पालक यांनी मिळून करायचे आहे. शैक्षणिक विकास घडवण्याची जबाबदारी शिक्षकासोबत पालकांची आहे. मुलगा कींवा मुलगी शाळेत यावी आणि चांगला माणूस म्हणून बाहेर जावी हीच आमची भुमिका आहे असेही ते यावेळी म्हणाले.

प्रारंभी विद्यालयाच्या वतीने उपस्थित माता भगिनींचा सत्कार करण्यात आला. यावेळी संगीत विभाचे राजेंद्र काळे आणि त्यांचा गायक विद्यार्थ्यांनी सुमधुर गाणी सादर करुन उपस्थितांना भारावून टाकले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक वसंत राठोड यांनी केले. प्रा. सिंधुताई दाभाडे, सौ. मुक्ताताई आर्दड यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. उपस्थित महिलांनी केलेल्या सुचना आणि मागण्यांचे विद्यालयाच्या वतीने स्वागत




करण्यात आले.

मेळाव्याला गढी आणि परिसरातील सौ. साधना कोल्हे, सौ. वैशाली वाघमारे, सौ. पुष्पा पंडित, सौ. उषा खरात, सौ. शिला जाधवर, सौ. आशा पवार यांच्यासह विद्यार्थ्यांच्या मात भगिनी तसेच पालकांची उपस्थिती लक्षणीय होती. हळदी कुंकूवाचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षिका श्रीमती आशा वराट, किर्ती खरात, प्रियंका ससाणे, सौ. गोंजारे यांच्यासह मुख्याध्यापक वसंत राठोड, उपमुख्याध्यापक रणजित सानप, पर्यवेक्षक कैलास गायकवाड आणि सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रणजित बडे यांनी केले तर आभार हरीभाऊ हकाळे यांनी मानले.

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे,

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra).
Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com,
epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com